# महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ

महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, मर्या. यांचे मुख्याकार्यालय खो.क्र.७४, तळमजला, गृहनिर्माण भवन, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे आहे. सदर कार्यालयांतर्गत महाराष्ट्र राज्यातील सर्व ३६ जिल्हयांकरीता प्रत्येकी एक असे जिल्हा कार्यालय कार्यरत आहे. राज्यातील १८ ते ६० वयोगटातील दिव्यांगांना स्वयं रोजगारासाठी कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम महामंडळामार्फत केले जाते. याकरीता केंद्र शासन आणि महाराष्ट्र राज्य शासन यांचे कडून निधी उपलब्ध करून दिला जातो.

महामंडळाचे मुंबई स्थित व जिल्हास्तरीय कार्यालयातील वित्तीय वर्ष २०२४-२५, २०२५-२६, २०२६-२७ करीता लेखाविषयक कामकाज व वर्षिक लेखे तयार करणे ह्या कामासाठी महामंडळास नोंदणीकृत सनदी लेखापाल यांची नियुक्ती करावयाची आहे. या करीता निविदा/दरपत्रके मागवून नियुक्तीची कार्यप्रणाली अवलंबिण्यात येत आहे. यास्तव महामंडळाची माहिती, निविदा भरण्यासंदर्भतील आवश्यक अटी व शर्ती आणि करावयाच्या कामाचे स्वरूप (Scope of Work) विस्तृतपणे पुढे नमुद करण्यात येत आहे.